शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ७३/२०१९

| | | |
|---|---|---|
| १.प्रा. दासू साजू पवार | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द | | |
| १. डेक्कन एज्यूकेशन सोसायटी,<br>फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस,पुणे ४<br>२.विलिंग्डन महाविद्यालय, सांगली | } | वि. प. |

**तक्रारीचे स्वरूप :**

डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस, पुणे ४ या शिक्षणसंस्थेचे विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यांचेकडील सहयोगी प्राध्यापक श्री. दासू साजू पवार विषय प्राणीशास्त्र यांनी दिनांक १९/०६/२०१९ रोजी समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. अर्जामध्ये नमूद केलेली तक्रार खालील प्रमाणे

मी विलिंग्डन महाविद्यालय, विश्रामबाग सांगली येथे सन २०१० पासून प्राणीशास्त्र विभागामध्ये सहयोगी प्राध्यापक (पुर्णवेळ) म्हणून कार्यरत आहे. मला अचानकपणे डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, पुणे संस्थेने दिनांक १५/०६/२०१९ रोजी विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथून किर्ती महाविद्यालय दादर, मुंबई येथे बदली करणेचा आदेश काढुन तसे प्राचार्यांना कळविले व प्राचार्यांनी मला त्यानूसार दिनांक १७/०६/२०१९ रोजी बदली आदेश व सोबत कार्यमुक्ती आदेश दिला व त्वरीत दिनांक १८/०६/२०१९ रोजी किर्ती महाविद्यालय, मुंबई येथे हजर होणेस सांगीतले. सदरचा आदेश हा पुर्णतः अन्यायकारक, बेकायदेशीर आहे. विद्यापीठ परिनियम क्रं. एस १७०,२—बी,२—सी,२—डी, ३, ६ व ७ यांचा भंग करून बदली आदेश दिलेला आहे. तरी आपणास नम्र विनंती की सदरचा अन्यायकारक व बेकायदेशीर बदली आदेश त्वरित रद्द करावा.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

स्टॅटयूट्सच्या प्रतीमध्ये कलम ४५२ विषयी प्राथमिक बाबी पाहता बदली करणे हा संस्थेचा अधिकार आहे.(Institution shall have a right to transfer their teaching and Non teaching staff) तसेच स्टॅटयूट्स मधील तरतुदी ह्या मार्गदर्शक तत्वे आहेत. कलम ड प्रमाणे प्रा. पवार यांची बदली केली आहे. मात्र कॅलेंडर वर्ष धरून ५ वर्षे कमी असताना म्हणजे ३१ मे, २०१९ पूर्वी सदर बदली केली असती तर त्यांची बदली सुट्टीच्या मध्यात झाली असती व त्यामुळे स्टॅटयूट्सचे उल्लंघन झाले असते. मात्र कलम ड चे पालन करण्यासाठी (transfer should be made at the beginning of academic year) शैक्षणिक वर्षाचा १७ जून या पहिल्या दिवशी प्रा. पवार विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे हजर होते व दुसऱ्या दिवसापासून त्यांची बदली करण्यात आली. याचाच अर्थ श्री. पवार यांची बदली सत्र सुरू होताना शेवटची ५ शैक्षणिक वर्षे असण्यापूर्वीच केलेली आहे. म्हणजेच संस्थेने ४५२ (ड) चे उल्लंघन केलेले नाही. तसेच सदरची बदली ही कोणत्याही आकसापोटी अथवा शिक्षा म्हणून केलेली नाही तर निव्वळ प्रशासकीय सोयीसाठी व विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन केलेली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार श्री. पवार यांनी तक्रारी व्यतिरिक्त चौकशीच्या दिवशी लेखी निवेदन २३/०९/२०१९ रोजी सादर केले व त्यात असे प्रतिपादन केले की, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली व किर्ती महाविद्यालय, मुंबई येथील एकुण कार्यभार लक्षात घेता तसेच विद्यार्थी संख्या लक्षात घेता त्यांना संस्थेने विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे ठेवणे आवश्यक होते तथापी सुडबुध्दीने त्यांची बदली परिनियम ४५२ (अ) व ४५२ (ड) चा भंग करून केलेली आहे. तसेच त्यांची बदली सहशिक्षण संचालकांची पुर्वपरवानगी न घेता केलेली आहे तसेच त्यांची सेवानिवृत्ती ३१/०५/२०२४ रोजी असल्याने दिनांक १७/०६/२०१९ रोजी म्हणजे बदलीच्या दिनांकाच्या दिवशी पाच वर्षे कमी सेवा असल्याने त्यांची बदली त्यांच्या इच्छेनूसार व मागणी नूसार करावी असा परिनियम आहे तथापी तो डावलून बदली करण्यात आली आहे त्यामुळे सदरची बदली रद्द करून त्यांचे सर्व थकीत वेतन अदा करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशी त्यांनी विनंती केली.

महाविद्यालय व संस्थेतर्फे प्राचार्य श्री. ताम्हनकर समक्ष हजर होते. त्यांनी संस्थेतर्फे व त्यांचेतर्फे खुलासा जा.क्र.१९२१/विधी/१९—२० दिनांक २३/०९/२०१९ ने दिला तसेच त्यांचे म्हणणे तोंडीदेखील समितीसमोर सांगितले.

दोन्ही बाजूंचे म्हणणे समितीने पुर्णपणे ऐकून घेतले व त्यावर साधकबाधक चर्चा केली. याप्रकरणी तक्रारदार बरेच वर्षापासून नोकरीत कार्यरत आहेत. त्याआधी ते पुणे येथील महाविद्यालयात कार्यरत होते व सांगली येथे बदली झाल्यावरही सुमारे सात वर्षे ते एकटे सांगली येथे रहात होते व त्यांचे कुटंब पुणे येथे रहात होते असे संस्थतर्फे प्रतिपादन करण्यात आले व त्यास तक्रारदाराने विरोध केला नाही. त्यामुळे बरेच वर्षांनी संस्थेने सर्व विचार करून प्रशासकीय कारणास्तव बदली केली आहे असे सस्थेचे म्हणणे आहे व तशी बदली करणे हा परिनियम ४५२ मध्ये संस्थेस दिलेला अधिकार आहे.

या प्रकरणी परिनियम ४५२ (अ) आणि (ड) हे बारकाईने बघणे आवश्यक होईल त्यामुळे खाली हे दोन्ही जसेच्या तसे उद्घृत केले आहेत.

**452 A)** Transfers when nessssary, should be made only at the commencement of the Academic year. However, under special circumstances such as promotions, personal requests of the teachers/non-teaching employees and further if the Management feels that the exigencies of the situation demand, transfers will be made even in the second term of the year. If the transfer is made in the middle of the term it should be eifected only for the sake of administrative convenience and the interest of the students should be safeguarded.

**D)** If a transfer is to be made during the last five years of the service of the employee, transfer shall be made as per his/her desire.

उपरोक्त परिनियमांचा सखोल विचार करता बदली करणे हा अधिकार संस्थेस असला तरीही उपपरिनियम अ ते फ चा विचार संस्थेने करणे हि आवश्यक राहिल असे उद्घृत केलेले आहे.

परिनियम ४५२ (अ) प्रमाणे बदली ही शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस करणेत यावी असे नमूद आहे आणि जर दुसऱ्या शैक्षणिक सत्रात बदली करावयाची असल्यास त्यामध्ये प्रशासकीय सुलभता व विद्यार्थ्यांचे हित जपण्यात यावे.

तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, संस्थेने विद्यार्थ्यांचे हित व प्रशासकीय सुलभताही लक्षात घेतलेली नाही. यावर संस्थेतर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, संस्थेने या दोन्हीही बाबींचा सखोल विचार करून मगच निर्णय घेतलेला आहे व प्रशासकीय कारणे तक्रारदारास कळविणेची गरज नाही.

या प्रकरणी तक्रारदाराची बदली १७ जून २०१९ रोजी म्हणजे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी तातडीने करण्यात आली आहे व त्यांना त्याच दिवशी कार्यमुक्त करून दुसरे दिवशी किर्ती एम.डुंगुरसी महाविद्यालय दादर, मुंबई येथे रूजू करून घेण्यात आले आहे. तक्रारदार ३१/०५/२०२४ रोजी सेवानिवृत्त होत असलेने दिनांक १७ जून २०१९ रोजी त्यांच्या सेवानिवृत्तीस पाच वर्षापेक्षा कमी कालावधी राहतो.

तक्रारदारने ज्या विद्यापीठ परिनियमांचा आधार घेतला आहे ते परिनियम अद्याप लागू नाहीत हे तक्रारदाराच्या निर्देशनास आणण्यात आले.

तक्रारदाराने आपल्याला मुंबई येथील वातारवरण सहन होत नाही असे नमुद केलेले आहे व प्रकृतीचे कारण पुढे करून बदली मागितली आहे. त्याचे असेही म्हणणे आहे की, मुंबई विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र ९ जून रोजी सुरू झालेले होते त्यामुळे ४५२ (अ) प्रमाणे शैक्षणिक वर्षाचे सुरवातीस बदली न झाल्यामुळे साधारण दहा दिवसाचा फरक या ठिकाणी येतो व त्यामुळे बदली रद्द करणेस पात्र आहे.

वरील तांत्रिक नियमांवर समितीच्या सर्व सदस्यांनी आपआपली मते प्रदर्शित केली व दोन्ही ४५२ (अ) व ४५२ (ड) चा एकत्रिक योग्य अर्थ लावण्याचा प्रयत्न केला.

परिनियम ४५२ (अ) चा उद्देश असा आहे की, शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये त्यामुळे बदल्या दरम्यानच्या काळात न करता शैक्षणिक सत्राच्या सुरवातीस करण्यात याव्यात.

परिनियम ४५२ (ड) मध्ये कर्मचाऱ्याच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षात बदली करावयाची असल्यास त्याची इच्छा विचारार्थ घ्यावी असे नमूद आहे. परिनियमातील तरतूदींचा विचार करता संस्थेने परिनियमातील तरतूदींचे पालन करणे आवश्यक आहे. सबब समिती खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

तक्रारदार यांचा सेवानिवृत्तीसाठी पाच वर्षापेक्षा कमी कालावधी राहिले असताना संस्थेने तक्रारदार यांची बदली केली आहे सबब तक्रारदार यांची बदली रद्द करून, संस्थेने परिनियम ४५२ (ड) नूसार कार्यवाही करावी. वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत दोन्ही पक्षकारांना देऊन कळविणेत यावे.

दिनांक : 26 DEC 2019

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
( श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य सचिव
( श्रीमती ए.ए. कदम )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)